# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 1017 /शि.वि./2016
दि. 1 /06/2016

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ. / उच्च प्राथ. / माध्यमिक शाळा,
महानगरपालिका, नागपूर

**विषय :– नागपूर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना युथ डेव्हलेपमेंट अलायन्स संस्थेमार्फत वाहतूकीचे नियमबाबत प्रशिक्षण देणेबाबत.**

**संदर्भ :– श्री. संजयकुमार गुप्ता यांचे दि.11.05.2016 चे पत्र.**

संदर्भिंय विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, श्री. संजयकुमार गुप्ता यांनी युथ डेव्हलेपमेंट अलायन्स संस्था, नागपूर सुरू केली असून या संस्थेव्दारा ट्राफिक पोलिसच्या सहकार्याने शासकीय कार्यालय, शाळा, महाविद्यालय यामध्ये रस्त्यावरील अपघात टाळण्याकरीता ट्राफिक नियमाबाबत जनजागृती करण्याचे कार्य करीत आहे. तसेच आतंकवादी विरोध, कन्या भृण हत्या विरोध, तंबाखू निर्मूलन इत्यादी विषयांवर जनजागृतीचे कार्य करण्यात येत आहे. या संस्थेमार्फत मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना विनामूल्य याबाबत जनजागृती करण्याकरीता अर्ध्या तासाचे प्रबोधन शिबिर आयोजित करण्यात येणार आहे.

मनपा शाळेतील इयत्ता 5 वी ते 12 पर्यंतच्या विद्यार्थ्यांना अर्ध्या तासाचे प्रबोधन करण्याची परवानगी देण्यात आली असून श्री. संजयकुमार गुप्ता यांना प्रबोधन शिबिराचे आयोजन करण्यास सहकार्य करावे. शक्य झाल्यास लोकवर्गणी गोळा करून संस्थेला आर्थिक सहाय्य करावे.

**(मा.उपायुक्त–1 यांचे दि.26.05.2016 चे मंजुरीन्वये.)**

Gupta

**शिक्षणाधिकारी**
**नागपूर महानगरपालिका नागपूर**

pc;2/reshma /Tembhurne sir/letterT